नगरपरिषदा/ नगरपंचायती क्षेत्रातील
अनधिकृत बांधकामांवर आकारावयाच्या
शास्तीकराबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्र. एमसीओ-२०१८/प्र.क्र.७३/नवि-१४,**
मंत्रालय, मुख्य इमारत (४ था मजला),
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७ सप्टेंबर, २०१८

वाचा :- सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.५३, दि.१०.०८.२०१८.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमातील कलम १८९(अ) नुसार अनधिकृत बांधकामाच्याबाबतीत प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्याबाबत तरतुद होती. काही बांधकाम व्यावसायिकांकडून इमारतींचे अवैधरित्या बांधकाम करुन त्यातील सदनिका व गाळे खरेदीदारांना विकतात आणि असे खरेदीदार, अशी बांधकामे कायद्यान्वये यथोचित रित्या अधिकृत आहेत, असा विश्वास ठेवून अशा सदनिका व गाळे खरेदी करतात, असे निदर्शनास आले आहे.

२. शास्तीची रक्कम, जणू काही ती मालमत्ता कराची थकबाकी होती असे समजून वसूल केली जाते आणि म्हणून अशा खरेदीदारांची कोणतीही चूक नसताना त्यांना ती शास्तीची रक्कम भरावी लागते. म्हणून, मालमत्ताकराच्या दुपटी इतकी शास्ती बसविण्याऐवजी शासनाकडून वेळोवेळी आदेशाव्दारे निश्चित करण्यात येतील अशा दराने शास्तीची रक्कम निर्धारणेबाबत सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.५३ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमात सुधारणा करण्यात आली आहे.

३. उपरोक्त अधिनियमान्वये करण्यात आलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने सर्व नगरपरिषदा/ नगरपंचायतींमध्ये एक वाक्यता असावी व अल्प उत्पन्न घटकांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून तसेच अनधिकृत निवासी बांधकामावर प्रभावी आळा बसविण्याकरिता शास्तीची पुढीलप्रमाणे आकारणी करण्याबाबत राज्यातील सर्व नगरपरिषदा/ नगरपंचायतींना निदेश देण्यात येत आहेत-:

| अ.क्र. | निवासी बांधकामाचे क्षेत्रफळ | आकारावयाच्या शास्तीचा दर |
|---|---|---|
| १) | ६०० चौ. फुटापर्यंतचे निवासी बांधकाम | शास्तीची आकारणी करण्यात येऊ नये. |
| २) | ६०१ ते १००० चौ. फुटापर्यंतचे निवासी बांधकाम | प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या ५०% दराने शास्ती आकारण्यात यावी . |
| ३) | १००१ चौ. फुटापुढील निवासी बांधकाम | प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्यात यावी (सध्याच्या दराने). |

Scanned with CamScanner

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०९२७१३३४०८३६२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay S Gokhale

Digitally signed by Sanjay S Gokhale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=[illegible], cn=Sanjay S Gokhale
Date: 2018.09.27 13:43:38 +05'30'

(सं.श.गोखले)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति :-

१. मा.विरोधी पक्षनेते, दोन्ही सभागृह, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
२. सर्व सन्मानीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य
३. मा.राज्यपाल महोदय यांचे प्रधान सचिव
४. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अप्पर मुख्य सचिव
५. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा.मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक
७. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
८. सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक
९. सर्व जिल्हाधिकारी
१०.राज्यातील सर्व नगरपरिषदा/ नगरपंचायतींचे नगराध्यक्ष
११.राज्यातील सर्व नगरपरिषदा/ नगरपंचायतींचे मुख्याधिकारी
१२.निवडनस्ती (नवि-१४).



Scanned with CamScanner